निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

नागपूर जिल्ह्यातील खापरी रेल्वे व कलकुही तसेच वर्धा जिल्ह्यातील कोपरा (पुनर्वसन) या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.११/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ३१ ऑक्टोबर, २०१८

प्रति,
जिल्हाधिकारी,
नागपूर व वर्धा.

**विषय :-** नागपूर जिल्ह्यातील खापरी रेल्वे व कलकुही तसेच वर्धा जिल्ह्यातील कोपरा (पुनर्वसन) या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक १८/०९/२०१८ चे पत्र
२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक १९/१०/२०१८ चे पत्र
३.या कार्यालयाचे क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१६/का.०८, दिनांक १८/०८/२०१८ चे पूर्वतयारीचे आदेश

महोदय,

नागपूर जिल्ह्यातील खापरी रेल्वे व कलकुही तसेच वर्धा जिल्ह्यातील कोपरा (पुनर्वसन) या ग्रामपंचायतीसाठी उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये प्रभाग रचना व आरक्षणाचा विशेष कार्यक्रम तर संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे.

उपरोक्त ग्रामपंचायतींची मुदत माहे डिसेंबर २०१८ मध्ये संपत असल्याने या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक घेणे आवश्यक आहे. या ग्रामपंचायतीच्या प्रत्यक्ष सार्वत्रिक निवडणुकीच्या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे .

## आ दे श

३.१ परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार उक्त नमूद ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात याव्यात.

३.२ निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा आमदार, खासदार, मंत्री व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

३.३ या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारेच राबविण्यात यावी.

३.४ सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

३.५ निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपिलासंदर्भात) यांच्या स्तरावरून देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. **याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.**

३.६ ग्रामपंचायतींची निवडणुक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पद्धतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून दिनांक १८/०८/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक (ग्रा. पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल ॲड्रेस | sec.mh@gov.in |

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

आपला,

(राजाराम झेंडे)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत- परिशिष्ट - अ

प्रत : १.. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.

६. विभागीय आयुक्त, नागपूर यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-०४.
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

८. पोलीस महानिरीक्षक, नागपूर.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर व वर्धा.

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक नागपूर व वर्धा.

११. प्रभारी उपायुक्त, संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना मतदान साहित्य विषयक कार्यवाहीसाठी.

१२. तहसिलदार, संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांना निवडणुकीच्या ऑनलाईन प्रक्रिये विषयक कार्यवाहीसाठी.

१३. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना निवडणूक कार्यक्रमाच्या प्रसिध्दी विषयक कार्यवाहीसाठी.

१४. निवडणूक कार्यासने, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

१५. निवड नस्ती (२ प्रती).

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.११/का-८, दि.३१/१०/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

परिशिष्ट - अ

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला नागपूर जिल्ह्यातील खापरी रेल्वे व कलकुही तसेच वर्धा जिल्ह्यातील कोपरा (पुनर्वसन) या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०२/११/२०१८ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१३/११/२०१८ (मंगळवार) ते दि.१७/११/२०१८ (शनिवार) वेळ स. ११.०० ते दु. ३.०० |
| ३ | नामनिर्देशनपत्र छानणी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१९/११/२०१८ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२२/११/२०१८ (गुरुवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.२२/११/२०१८ (गुरुवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.०२/१२/२०१८ (रविवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.०३/१२/२०१८ (सोमवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.०५/१२/२०१८ (बुधवार) |

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशाप्रमाणे,

(राजाराम झेंडे)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र